कार्यालय परिपत्रक क्र. ३०३

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
वाहतुक व्यवस्थापक कार्यालय
दिनांक : ०४/१०/२०२४

सर्व आगार व्यवस्थापक/आगार अभियंता
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**विषयः-लहान मुले एकटे प्रवास करतांना त्यांचे बाबतीत काही संशयास्पद आढळुन आल्यास चालक-वाहक सेवकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत**

संदर्भः- मा.निखिल पिंगळे, पोलीस उपायुक्त, गुन्हे शाखा पुणे शहर यांच्या कार्यालयाकडील जावक क्र./पोऊआ/गुन्हे/भरोसा/म.स.क./पुणे शहर/२४६७/२०२४ दिनांक २६/०९/२०२४ रोजीचे पत्र

वाहतुक विभागाकडील विशेषतः सर्व चालक-वाहक,गॅरेज सुपरवायझर, टाईमकिपर तसेच आगार व्यवस्थापक यांना कळविण्यात येते कि, महामंडळाच्या बसेसमधुन महिला प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर सुरक्षित होण्याच्या दृष्टीने तसेच बस मधुन लहान मुले एकटे प्रवास करतांना त्याच्या बाबतीत काही संशयास्पद आढळुन आल्यास तथा बसेसमध्ये गर्दीच्या वेळेत टवाळखोर मुले जाणुन बुजून विद्यार्थ्यांना व महिला प्रवाशांना त्रास देत असतात त्याबाबत दिनांक २३/०९/२०२४ रोजी पुणे शहर पोलीस उप-आयुक्त कार्यालयामध्ये मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या मार्गदर्शना खाली महिला दक्षता आढावा बैठक घेण्यात आलेली होती. त्या बैठकीमध्ये वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे कि, पी.एम.पी.एम.एल.बसेसमधुन उपरोक्त प्रमाणे घटना घडल्यास चालक-वाहक सेवकांनी तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास ११२ या क्रमाकांवर माहिती देणे. तसेच महामंडळाकडील अपघात विभाग व संबंधित बस स्थानकावरील कंट्रोलर सेवकांना फोनद्वारे माहिती देणे.

सदरील कार्यालय परिपत्रकाद्वारे सर्व आगार व्यवस्थापक यांना कळविण्यात येते कि, आगारनिहाय चालक-वाहक व कार्यशाळेतील कर्मचारी यांना वरील विषयाबाबत गेट मिटींगद्वारे माहिती देणे.

**सबब उपरोक्त विषयाबाबत चालक-वाहक सेवकांबाबत विद्यार्थ्यांनी व महिला प्रवाशांच्या तक्रारी महामंडळास प्राप्त झाल्यास संबंधित मार्गावरील चालक सेवकांवर कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रतः- मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
मा.सहव्यवस्थापकीय संचालक
यांजकडेस माहितीसाठी सविनय सादर

प्रती:-
सि.टा.कि., टा.कि. गॅरेज सुपरवायझर,
स्थानक प्रमुख, कंट्रोलर,
आय.टी.,बी.आर.टी.एतक्रार निवारण कक्ष,
पास विभाग, मुख्यालय क्र.१ व २, नोटीस बोर्ड

पोलिस उप-आयुक्त, गुन्हे यांचे कार्यालय,
२ साधू वासवाणी रोड, कॅम्प, पुणे-४११००१,
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६११९०७३/२६११९३४९
ई-मेल :- dcpcrime.pune@nic.in

| | |
|---|---|
| जा.क्र./पोउआ/गुन्हे/भरोसा/म.स.क./पुणे शहर/२७६५ /२०२४ | दिनांक :- २६ /०९/२०२४ |

प्रती,
मा. वाहतूक व्यवस्थापक,
पी.एम.पी.एम.एल.,
शंकरशेठ रोड, पुणे

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमि.
वाहतुक व्यवस्थापक कार्यालय
आवक क्र./
जावक क्र -
दिनांक- 3/10/24

विषय :- कार्यवाही करुन त्याचा पूर्तता अहवाल पाठविणेबाबत...
संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०, मंत्रालय, मुंबई, दि.१२ मे २०१५
२) दि.२३/०९/२०२४ रोजी पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यालय येथे घेण्यात आलेली महिला दक्षता आढावा बैठक अन्वये...

---

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भान्वये दि.२३/०९/२०२४ रोजी पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यालय येथे मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला दक्षता आढावा बैठक घेण्यात आलेली होती.

१) बस डेपो, बस स्टॅन्ड या ठिकाणी रोडवरील दिव्यांची व्यवस्था करुन घेणे. बस डेपो, बस स्टॅन्ड तसेच पी.एम.पी.एम.एल.बस मध्ये सी.सी.टी.व्ही.कॅमेरे (night vision) बसवून घेणे. विद्युत / BRT
२) बस स्थानकात, बसमध्ये एखादी महिला अथवा लहान मुले एकटे आढळून आल्यास, त्यांची विचारपूस करावी व त्यांना योग्य ती मदत करावी. प्रशक
३) बस स्थानकात सुरक्षा रक्षक नेमावेत. नेमलेल्या सुरक्षा रक्षकांची नावे व त्यांचे संपर्क क्रमांक भरोसा सेल कार्यालय, गुन्हे शाखा, पुणे शहर येथे पाठविण्यात यावी. सुरक्षा विभाग
४) लहान मुले एकटे प्रवास करताना त्यांचे बाबतीत काही संशयास्पद आढळून आल्यास, त्याबाबत पोलीस प्रशासनास कळवून त्यांची मदत घ्यावी. परिपत्रक / कामगार
५) आपले चालक/वाहक प्रवास करत असताना, त्यांना बसमध्ये अथवा रस्त्यात टवाळखोर मुले आढळून आल्यास त्याबाबत तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास ११२ या क्रमांकावर माहिती देतील. परिपत्रक डेपो
६) डेपोमध्ये कार्यरत असणारा स्टाफ तसेच चालक, वाहक यांची त्याबाबत कार्यशाळा आयोजीत करुन त्यांना वरिलप्रमाणे सूचना द्याव्यात.

सदरचा पूर्तता अहवाल दि.०३/१०/२०२४ पर्यंत ईकडील महिला सहाय्य कक्ष, भरोसा सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर या कार्यालयाचे crimewoman.pune@nic.in या ई-मेल आय.डी.वर पाठविण्यात यावा.

4888

PMPML/IWL/INWARD/2024-25/4888
30/09/2024

पुणे ... परिवहन
4888
01 OCT 2024

(निखिल पिंगळे)
पोलीस उप आयुक्त, गुन्हे,
पुणे शहर

श्री कारखान
विद्युत / सुरक्षा विभाग / BRT / कारखाने

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड
3/10